# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 28.03.2026** **वार- शनिवार**

---

**भरती**

पुण्यात पोलीस भरती दरम्यान मैदानी चाचणीत धावताना तेवीस वर्षांच्या एका तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना शिवाजीनगर पोलीस मुख्यालायतील मैदानावर आज सकाळी घडली. सोळाशे मीटर धावण्याची चाचणी देत असताना अचानक त्याला 'फिट' आली. मैदानात बेशुद्ध होऊन कोसळल्यानंतर मैदानावर उपस्थित असलेल्या वैद्यकीय पथकानं त्याची प्राथमिक तपासणी केल्यावर त्याच्या हृदयाचे ठोके मंद झाल्याचं निदर्शनास आलं. त्याला तातडीनं ससून रुग्णलयात दाखल करण्यात आलं मात्र, उपचारांपूर्वीच तो मरण पावल्याचं ससूनमधील वैद्यकीय तज्ज्ञांनी सांगितलं.

**क्रमांक**

महाराष्ट्र शासनाच्या "१५० दिवसांचा ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रम" या उपक्रमात पुणे जिल्हा परिषदेनं महाराष्ट्रात पहिला क्रमांक पटकावला. जिल्हा परिषदेच्या या यशस्वी कामगिरीचं कौतुक करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांना प्रथम क्रमांकाचं प्रशस्तीपत्रक आज मुंबईतील एका समारंभात प्रदान केलं. या स्पर्धात्मक मूल्यमापनात पुणे जिल्हा परिषदेला २०० पैकी १९६ पेक्षा जास्त गुणांसह प्रथम क्रमांक मिळाला. सेवा कर्मी पुरस्कारांमध्येही जिल्हा परिषदेला "प्रथम" क्रमांकानं सन्मानित करण्यात आलं. ई-गव्हर्नन्सच्या सकारात्मक परिणामामुळं नागरिकांचा प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ झाला आहे.

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात लवकरच 'स्कूल ऑफ अंडरग्रॅज्युएट स्टडीज' सुरू करण्याचा मानस आहे. यामध्ये बी. ई. आणि बी. टेक. अभ्यासक्रमांसाठी भारतीय अंतराळ विज्ञान आणि तंत्रज्ञान संस्थेसमवेत अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत चर्चा झाली आहे. या विषयातील एक अभ्यासक्रम लवकरच सुरू होईल' अशी घोषणा कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी अधिसभेत केली.

**ग्रीन**

पुणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील शाळांना पर्यावरणपूरक बनविण्याच्या उद्देशानं टाटा ऑटोकॉम्प सिस्टिम्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्या सीएसआर निधीतून आणि सस्टेनॅबिलिटी इनिशिएटिव्हज यांच्या माध्यमातून जिल्हा परिषदेच्या चार शाळांमध्ये ग्रीन स्कूल प्रकल्पाचं लोकार्पण नुकतंच झालं. खेड तालुक्यातील बिरदवाडी, देशमुखवाडी, तोरणे आणि रानमळा (कडूस) इथल्या जिल्हा परिषद शाळांमध्ये हा प्रकल्प राबविण्यात आला आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून शाळांमध्ये पर्यावरणपूरक पायाभूत सुविधा निर्माण करून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संरक्षण, ऊर्जा बचत आणि शाश्वत जीवनशैली याबाबत जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

सस्टेनॅबिलिटी इनिशिएटिव्हजच्या अपूर्वा कुलकर्णी म्हणाल्या की, शासकीय शाळांना हरित शाळांमध्ये रूपांतरित करण्याच्या उद्देशानं या प्रकल्पाची सुरुवात झाली. टाटा ऑटोकॉम्पच्या सहकार्यानं आतापर्यंत ८ शाळांमध्ये ग्रीन स्कूल प्रकल्प यशस्वीपणे राबविण्यात आले आहेत अशी माहिती त्यांनी दिली.

**पट**

पुणे जिल्हा परिषद शाळेत पाल्याचा प्रवेश घेणाऱ्या पालकांना ग्रामपंचायतीमार्फत करमाफी, पट वाढविणाऱ्या शाळांचा सन्मान, अंगणवाडी सक्षमीकरण आणि शाळाजोडणी, इंग्रजी विषयावर भर आणि सेमी इंग्रजी वर्ग सुरू करणे, अशा शिफारशी जिल्हा परिषद शाळांची पटसंख्या वाढविण्यासाठी करण्यात आल्या आहेत. राज्यातील जिल्हा परिषद शाळांतील पटसंख्या कमी होत असल्याची दखल शिक्षण विभागानं घेऊन पटसंख्या वाढवण्यासाठी शिक्षक, अधिकाऱ्यांची समिती नियुक्त केला होती. या समितीनं अभ्यास करून आवश्यक उपाययोजनांचा समावेश असलेला सविस्तर अहवाल शिक्षण विभागाला सादर केला आहे. शाळा सुरू होण्यापूर्वी मार्च ते जून या कालावधीतीत करायच्या उपाययोजना, शाळा सुरू झाल्यावर करायच्या उपाययोजना यात समाविष्ट आहेत. विविध माध्यमांचा वापर करून पालक, माजी विद्यार्थ्यांना शाळांसोबत जोडण्यासारख्या उपक्रमांवर भर देण्यात आला आहे.

**मासा**

शालेय विद्यार्थ्यांना आभासी जग आणि वास्तव जग यांच्यातील फरक समजावून सांगण्याची जबाबदारी शिक्षकांची असल्याचं मत माध्यम तज्ञ क्षितिजा टिळक यांनी व्यक्त केलं आहे. पुण्यातील माधव सदाशिव गोळवलकर गुरुजी माध्यमिक विद्यालयात शिक्षकांसाठी आयोजित केलेल्या "माध्यम साक्षरता" या कार्यशाळेत त्या आज बोलत होत्या. प्रत्यक्ष अनुभव, संवाद आणि सामाजिक सहभाग यांना प्राधान्य दिल्यास विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होत असल्याचंही त्यांनी यावेळी सांगितलं.

**रोजगार**

तळेगाव दाभाडे इथल्या इंद्रायणी विद्यामंदिर संस्थेच्या प्रांगणात आयोजित नोकरी महोत्सवाचं उद्घाटन खासदार श्रीरंग बारणे यांच्या हस्ते आज करण्यात आलं. तरुणांनी नोकरीच्या मागं न लागता स्वयंरोजगार करून रोजगार निर्मिती करावी असं आवाहन खासदार बारणे यांनी उपस्थित उमेदवारांना केलं. संस्थेचे कार्यवाह चंद्रकांत शेटे म्हणाले की गतवर्षीपेक्षा यंदा गरजू उमेदवारांची जास्त नोंदणी झाली आहे.

**उजनी**

पुणे, सोलापूरसह अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी मोठा आधार असलेल्या उजनी धरणातील गाळ काढण्यासाठी जलसंपदा विभागाच्या वतीनं तिसऱ्यांदा गाळाचं सर्वेक्षण करण्यात येणार आहे. यापूर्वी जिल्ह्यातील दुष्काळाची तीव्रता कमी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या उजनी धरणात गाळ साठण्यात आल्यानं पाणी साठवणूक क्षमता कमी झाली आहे. गाळ काढल्यास उजनीतील पाणी साठवणूक क्षमता वाढून लातूर, पुणे, सोलापूर जिल्ह्यातील उपसा सिंचन योजनेसाठी पाणी उपलब्ध होणार आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**